महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था,(मिपा) औरंगाबाद

# मोड्यूल क्र.४

# डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका







**प्रस्तावना**-

प्रत्येक बालकाला आर टी ई २००९ नुसार सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक वाडी वस्तीवर शाळा व शिक्षणाची व्यवस्था शासनामार्फत करण्यात आली आहे. त्यासाठी भौगोलिक दृष्ट्या दुर्गम, डोंगरी क्षेत्रात आवश्यक अंतर व संख्येचा निकष शिथिल करीत गाव तेथे शाळा सुरु करून प्रत्येक मूल शिकावे, प्रगत व्हावे व त्याचा सर्वांगीण विकास व्हावा ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली. मात्र दुर्गम डोंगरी क्षेत्रात खऱ्या अर्थाने कायद्यात अपेक्षित केलेल्या दर्जेदार शिक्षणाचे उदिष्ट साध्य करतांना तेथील शालेय नेतृत्वाचा कस लागतो. डोंगरी दुर्गम क्षेत्रातील अडचणी, समस्या यांना सामोरे जात निराश न होता जिद्दीने व कौशल्याने आपले नेतृत्व पणास लावून काही शिक्षक/ मुख्याध्यापक मात्र अभिमानास्पद कामगिरी करीत असताना दिसतात.

अशा डोंगरी व दुर्गम क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्वाची भूमिका व गुणविशेष जाणून घेवून एका दिव्याने दुसरा दिवा प्रज्वलित करून आसमंत उजळावा तसा या मोड्यूल च्या अध्ययनातून प्रेरणा घेत शिक्षण हक्कापासून वंचित राहिलेल्या डोंगरी क्षेत्रातील प्रत्येक बालकांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश यावा ही अपेक्षा. प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीत जीवन जगणाऱ्या आदिवासी बांधवांना दर्जेदार शिक्षणाचा त्यांचा हक्क खऱ्या अर्थाने त्यांना प्राप्त व्हावा या दृष्टीने अशा डोंगरी क्षेत्रात काम करणाऱ्या शालेय नेतृत्वाला एक नवी दिशा मिळावी, आपले कार्य करतांना येणाऱ्या समस्येवर, अडचणींवर समर्थपणे मात करता यावी. या हेतूने प्रस्तुत मोडूयुल विकसित करण्यात आले आहे.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

१. डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
२. डोंगरी क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्वाचे गुणविशेष जाणून घेणे.
३. डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्वापुढील आव्हाने व त्यांना सामोरे जाण्याच्या रिती समजून घेणे.

**डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्व संकल्पना -**

डोंगर दऱ्या यांनी युक्त, वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने दुर्गम अशा प्रदेशात देखील अनेक वाड्या वस्त्यामध्ये असंख्य आदिवासी बांधव वस्ती करून राहत आहेत. शासनाने अशा बहुसंख्य वाड्यावस्त्यांवरील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था त्या त्या भागात केलेली आहे. डोंगर दऱ्या मुळे, रस्ते, वीज व दळणवळण व्यवस्थेच्या अपुऱ्या सोयींमुळे अशा भागात पुरेशा भौतिक सुविधा बऱ्याचदा उपलब्ध होऊ शकत नाहीत. अशा दुर्गम प्रदेशातील शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक, मुख्याध्यापक, आणि पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणजे डोंगरी क्षेत्रातील शालेय नेतृत्व..

भौतिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय दृष्ट्या मागे असलेल्या अशा दुर्गम व समस्याग्रस्त प्रदेशात शासनामार्फत विद्यार्थ्यांना त्यांचा मुलभूत शिक्षण हक्क प्राप्त करून देण्याची जबाबदारी सोपविलेले शिक्षक व मुख्याध्यापक यांची भूमिका खूपच महत्वपूर्ण ठरते. अशा ठिकाणी शालेय नेतृत्वाचा खऱ्या अर्थाने कस लागतो. मात्र सक्षम शालेय नेतृत्व अशा प्रतिकूल परिस्थितीत देखील आपली भूमिका यथायोग्य रित्या पार पाडून, येणाऱ्या असंख्य समस्यांवर मात करीत शिक्षणापासून कोसो मैल दूर असलेल्या गरीब, अशिक्षित, आदिवासी बांधवांच्या झोपडीत ज्ञानाचा प्रकाश पोहोचविण्यात यशस्वी ठरते.

**डोंगरी क्षेत्र व या क्षेत्राची वैशिष्टे –**

- **डोंगरी क्षेत्र-** राज्यातील सर्व विभागांचा समतोल विकास व्हावा असे शासनाचे धोरण आहे. व त्या दृष्टीने राज्याच्या पंचवार्षिक/ वार्षिक योजनांची आखणी करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून डोंगरी विभागांचा विकास करण्यासाठी डोंगरी विभागाच्या काही विशिष्ट गरजा , प्रश्न लक्षात घेवून राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र विशिष्ट निकषांच्या आधारे महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या दिनांक १८ जानेवारी २०१० च्या शासननिर्णयाद्वारे निश्चित करण्यात आले. ते निकष व त्यानुसार डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी पुढील प्रमाणे सुरु आहे.
- **डोंगरी विभागाचे निकष –** वरील शासन निर्णयानुसार एखाद्या भौगोलिक भागास डोंगरी भाग समजण्यासाठी खालील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

  अ) त्या क्षेत्राचा सरासरी उतार ३० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आणि तसेच सापेक्ष उंची ३०० मीटरहून जास्त असणे आवश्यक आहे. (प्रमुख डोंगरी भाग)

  ब) त्याखेरीज प्रमुख डोंगरी भागाचा भौगोलिक विस्तार हा १७ टक्के ते ३० टक्के उतार असल्यास (अंशतः डोंगरी क्षेत्र)

  क) मात्र वरील "अ " व "ब" येथील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे किमान क्षेत्रफळ १०० चौरस कि.मी. असणे आवश्यक आहे.

जर एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफळ किमान १०० चौरस कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असून अशा डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास तो पूर्ण तालुका डोंगरी विभाग / पूर्ण गट डोंगरी तालुका समजण्यात येईल . तसेच जर एखाद्या तालुक्यात वरील अटी पूर्ण करणाऱ्या डोंगरी भागाचे क्षेत्रफळ किमान १०० ची. कि.मी. असून अशा डोंगरी भागाचे क्षेत्रफळ तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या २० टक्के पेक्षा जास्त परंतु ५० टक्के पेक्षा कमी असल्यास तो तालुका उपगट डोंगरी तालुका समजण्यात येईल. पूर्णगट तालुक्यांत तालुक्यातील सर्व गावांचा समावेश होतो तर उपगट तालुक्यांमध्ये डोंगरी क्षेत्रात येणाऱ्या गावांचाच समावेश होतो.

**डोंगरी  विभागात समाविष्ट क्षेत्र व अनुज्ञेय निधी** –

वरील निकषांसंदर्भात  महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र नागपूर यांचेकडून रिमोट सेन्सिंग या अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपग्रहामार्फत प्राप्त पृथ्वीच्या छायाचित्रांचे विश्लेषण करून  राज्यातील २१ जिल्ह्यांतील ७३ पूर्णगट डोंगरी तालुके व ३५ उपगट डोंगरी तालुके असे डोंगरी विभागाचे क्षेत्र निश्चित करून घोषित करण्यात आले आहे. पूर्णगट डोंगरी तालुक्यास दरवर्षी प्रत्येकी ६० लाख तर उपगट डोंगरी तालुक्यास ३० लाख इतका निधी देय आहे. त्यातून करावयाच्या कामांची यादी पुढील प्रमाणे,

१. शाळा बांधकाम व दुरुस्ती
२. पाटबंधाऱ्याची कामे.
३. रस्ते विकासाची कामे.
४. पाणी पुरवठ्याची कामे.
५. समाज मंदिरे.
६. सामाजिक सभागृहे.
७. उपसा जलसिंचन योजना व त्याच्या दुरुस्त्या
८. एस.टी.निवारा ( पिकअप शेड )
९. अंगणवाडीसाठी इमारतीचे बांधकाम.
१०. सौर ऊर्जेवरील दिवे.
११. विद्युत विकासाची कामे. इत्यादी.

**राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र दर्शविणारे विवरणपत्र**

**(शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.डोविका-२००९/प्र.क्र.६/का.१४८३.दि.१८ जानेवारी २०१०)**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पूर्ण गट डोंगरी तालुकयाचे नाव | उपगट डोंगरी तालुक्याचे नाव ( गावांची संख्या ) |
|---|---|---|---|
| १. | ठाणे | १.मोखाडा<br>२.शहापूर<br>३.जव्हार<br>४.वाडा<br>५.मुरबाड | १.वसई (३७)<br>२.भिवंडी (४०) |
| | एकूण | ०५ | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | रायगड | ६. तळा<br>७.खालापूर<br>८.महाड<br>९.पोलादपूर<br>१०.रोहा<br>११.सुधागड<br>१२.म्हसाळा<br>१३.पेण<br>१४.मुरुड<br>१५.कर्जत<br>१६.माणगाव | ३.पनवेल (२९) |
| | एकूण | ११ | ०१ |
| ३. | रत्नागिरी | १७.संगमेश्वर<br>१८.चिपळूण<br>१९.लांजा<br>२०.खेड<br>२१.राजापूर | ०४.मंडणगड (३६) |
| | एकूण | ०५ | ०१ |
| ४. | सिंधुदुर्ग | २२.कुडाळ<br>२३.कणकवली<br>२४.वैभववाडी<br>२५.सावंतवाडी<br>२६ देवगड | ०५.मालवण (२८) |
| | एकूण | ०५ | ०१ |
| ५. | नाशिक | २७.सुरगाणा<br>२८.कळवण<br>२९.पेठ<br>३०. इगतपुरी<br>३१.बागलाण<br>३२.सिन्नर<br>३३.नाशिक<br>३४.दिंडोरी | |
| | एकूण | ०८ | ०० |
| ६. | धुळे | ३५.शिरपूर<br>३६.साक्री | |
| | एकूण | ०२ | ०० |
| ७. | नंदुरबार | ३७.अक्राणी (धडगाव)<br>३८.अक्कलकुवा | ०६.तळोदा (१७)<br>०७.शहादा (२७) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३९.नवापुर | |
| | एकूण | ०३ | ०२ |
| ८. | जळगाव | - | ०८.यावल (०९)<br>०९.रावेर (१४)<br>१०.चोपडा (१८)<br>११.एदलाबाद (१२) |
| | एकूण | ०० | ०४ |
| ९. | अहमदनगर | ४०.अकोले<br>४१.संगमनेर | १२.अहमदनगर (१६)<br>१३.पारनेर (१०)<br>१४.पाथर्डी (०९) |
| | एकूण | ०२ | ०३ |
| १०. | पुणे | ४२.खेड<br>४३ आंबेगाव<br>४४.मुळशी<br>४५ भोर<br>४६.मावळ<br>४७.पुरंदर(सासवड)<br>४८.वेल्हे<br>४९.जुन्नर<br>५०.हवेली | |
| | एकूण | ०९ | ०० |
| ११. | सांगली | ५१.शिराळा | १५.खानापूर (०५)<br>१६.कडेगाव (०४) |
| | एकूण | ०१ | ०२ |
| १२. | सातारा | ५२.जावळी<br>५३.महाबळेश्वर<br>५४. पाटण<br>५५.सातारा<br>५६.वाई<br>५७.कोरेगाव<br>५८.खटाव<br>५९.खंडाळा | १७.माण (२७)<br>१८.फलटण (२२)<br>१९.कराड (८३) |
| | एकूण | ०८ | ०३ |
| १३. | कोल्हापूर | ६०.शाहुवाडी<br>६१.गगनबावडा<br>६२.राधानगरी<br>६३.भुदरगड<br>६४.पन्हाळा<br>६५.करवीर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६६.कागल<br>६७.चंदगड<br>६८.आजरा<br>६९.गडहिंग्लज | |
| | एकूण | १०. | ०० |
| १४. | औरंगाबाद | ७०.सोयगाव | २०.सिल्लोड (२९)<br>२१ खुलदाबाद (३२)<br>२२. कन्नड (६४) |
| | एकूण | ०१ | ०३ |
| १५. | बीड | | २३.आष्टी (१०)<br>२४.पाटोदा (०४)<br>२५.परळी (१४)<br>२६.केज (०८)<br>२७.बीड (१४)<br>२८.आंबेजोगाई (०८)<br>२९.धारूर (१२) |
| | एकूण | ०० | ०७ |
| १६. | हिंगोली | | ३०.हिंगोली (६६)<br>३१ कळमनुरी (४०) |
| | एकूण | ०० | ०२ |
| १७. | नांदेड | ७१.किनवट | |
| | एकूण | ०१ | ०० |
| १८. | बुलडाणा | - | ३२ संग्रामपूर(२५) |
| | एकूण | ०० | ०१ |
| १९. | अकोला | | ३३.पातुर (२९) |
| | एकूण | ०० | ०१ |
| २०. | अमरावती | ७२.चिखलदरा<br>७३.धारणी | |
| | एकूण | ०२ | ०० |
| २१. | यवतमाळ | | ३४.पुसद (३०)<br>३५.उमरखेड (४८) |
| | एकूण | ०० | ०२ |
| | एकूण २१ जिल्हे | ७३ पूर्णगट तालुके | ३५ उपगट तालुके |

टीप — उपरोक्त डोंगरी तालुके व गावांची काही नावे जिल्हा/तालुका विभाजनामुळे दि.३१ जुलै २०१२ व दि.१५ जून २०१८ च्या शासननिर्णयानुसार सुधारित करण्यात आली आहेत.

महाराष्ट्रात असलेल्या डोंगरी क्षेत्रातील लोकजीवनाचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परीस्थितीचे थोडक्यात स्वरूप पुढील प्रमाणे..

१. डोंगरी क्षेत्रातील भौगोलिक स्थिती व वाहतुकीची व्यवस्था —





भौगोलिक दृष्ट्या उंच-सखल डोंगर दऱ्यानी युक्त असा भूप्रदेश म्हणजे डोंगरी क्षेत्र. अशा डोंगरी क्षेत्रात अनेक जाती जमातीतील लोक वास्तव्यास आहेत. टेकडी टेकडी वर झोपड्या बांधून अगदी विरळ स्वरुपात एकमेकांपासून थोड्या थोड्या अंतरावर असलेली सुटसुटीत घरे अर्थात अगदी ४/५ घरांपासून ८/१० घरांपर्यंत ची वस्ती म्हणजे एक एक पाडा.. एका घरांपासून दुसऱ्या घरापर्यंत किंबहुना एका पाड्यापासून दुसऱ्या पाड्यापर्यंत जाण्यासाठी पायवाट हाच मार्ग... ३/४ पाडे मिळून एक गाव या गावाला जाण्यासाठीसुद्धा अभावानेच रस्ता... जे रस्ते आहेत तेही पक्के रस्ते अभावानेच.... मोठी वस्ती असलेल्या गावांसाठी तयार केलेले रस्तेही कच्या पक्या स्वरूपातील घाट रस्ते, वळणावळणाचे रस्ते.. त्यामुळे वाहतुकीची साधने खूपच कमी.... लोकांच्या प्रवासाचे मुख्य साधन म्हणजे कालीपिली गाडी... गाडीत व टपावर बसून एका गाडीत सुमारे २५ ते ३० प्रवासी बसून केला जाणारा अत्यंत धोकेदायक प्रवास त्यांच्यासाठी नेहमीचा.... अशा अवस्थेत बाहेरून येणाऱ्या शिक्षकाला डोंगर दऱ्यातील, नदी नाल्यांतून असा धोकेदायक खडतर प्रवास करीत अशा पाड्यातील शाळांत वेळेवर पोहोचणे व पूर्णवेळ थांबणे म्हणजे एक मोठे दिव्यच..

२. डोंगरी क्षेत्रातील भौतिक / आर्थिक स्थिती-





डोंगरी क्षेत्रातील लोकांचे उपजीविकेचे मुख्य साधन म्हणजे पारंपारिक पद्धतीने केली जाणारी डोंगरावरील तुटपुंजी शेती, या शिवाय थोड्या फार प्रमाणात जंगलातील कंदमुळे, फळे गोळा करणे, नदी नाले जवळ असेल अशा ठिकाणी मासे पकडणे,गुरे-ढोरे, शेळ्या पाळणे इत्यादी.. उत्पन्नाच्या साधनांअभावी अतिशय गरिबीची स्थिती.. गरजा मर्यादित, वीज अभावाने उपलब्ध असल्याने रात्री अंधारात राहण्यासाठी सरावलेले, घरे कुडांची किंवा अभावाने दगड मातीची, मनोरंजनाची साधने जवळ जवळ नाहीच, व्यसनाधीनता अधिक..., स्थानिक परीस्थिती नुसार दररोज हाताला मिळेल असे काम करणे, आठवड्यातून एखादा दिवस जवळच्या मोठ्या गावात बाजारासाठी जाणे ही दिनचर्या..

३. डोंगरी क्षेत्रातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती-





महाराष्ट्रातील डोंगरी क्षेत्रात मुख्यतः नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यात पावरा, तडवी, भिल्ल, कोंकणी, मावची या जमाती, विदर्भाकडे गोंड, कोरकू, कोलामी, पारधी, बंजारा या जमाती तर ठाणे, नासिक कडे वारली, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात राहणाऱ्या विविध जाती जमाती त्यांच्या स्वतंत्र व वेगवेगळ्या बोलीभाषां-सांस्कृतिक वैशिष्ट्यांसह राहात आहेत. होळी सारखा एखादाच महत्वाचा स्थानिक सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, स्थानिक देवी देवतांना नवस बोलणे, गावची यात्रा, विवाह पद्धती या माध्यमातून त्यांची वेगवेगळी सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्टे, रूढी व परंपरा दिसून येतात. या क्षेत्रातील लोकांना राज्यातील अथवा देशातील राजकीय व्यवस्थेबाबत फारसा गंध नसतो. स्थानिक पातळीवरील गावाचा प्रमुख व गावातील प्रतिष्ठित समजली जाणारी मंडळी यांची गावपंचायत/जातपंचायत असते. या पंच मंडळीं मार्फत स्थानिक भांडणे सोडविली जातात, अथवा काही सार्वजनिक निर्णय घेतले जातात. बहुसंख्य डोंगरी वस्त्यांमधील लोकांत आरोग्य व स्वच्छतेविषयक पाहिजे तशी जागृती दिसत नाही. शिवाय आजारी पडल्यास वैद्यकीय उपचाराऐवजी मंत्र तंत्र यावर अधिक विश्वास ठेवला जातो. पुरेशा अन्नपुरवठ्या अभावी कुपोषण, अनुवंशिकतेतून मुलांमध्ये येणारा सिकलसेल सारखा गंभीर आजार इत्यादी समस्या तसेच व्यसनाधीनता,

बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथा मोठ्या प्रमाणात आढळतात. या सर्व समस्यांचा विपरीत परिणाम तेथील लोकजीवनावर झालेला दिसून येतो.


४. डोंगरी क्षेत्रातील शैक्षणिक स्थिती-

डोंगरी क्षेत्रातील काही शाळांना स्वतःची पक्की इमारत नाही. बहुसंख्य शाळा कुडाच्या / कच्च्या इमारतीत भरतात. शाळेकडे बघण्याचा बहुसंख्य पालकांचा दृष्टीकोन सकारात्मक नाही. शाळेचे महत्व न समजल्यामुळे मुलांना शाळेत नियमित पाठविण्याबाबत पालकांची अनास्था दिसते. शिक्षण हा बालकांचा मुलभूत अधिकार आहे ही जाणीव त्यांना अभावानेच दिसते. सर्वसाधारणपणे केवळ शासकीय योजनांसाठी / दुपारचे जेवण मिळते म्हणून मुलांना शाळेत पाठविले जाते. गुरे चारणे, घर / लहान भावंडांना सांभाळणे. यासाठी शाळेपेक्षा मुलांना घरी ठेवण्याकडे पालकांचा कल दिसतो. रस्ते, वाहतूक, दवाखाने यासारख्या अनेक भौतिक सुविधाअभावी शासकीय नोकर अशा भागात काम करण्यास नाखुश दिसतात. अशा दुर्गम भागात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून शासनामार्फत अधिक आर्थिक लाभ दिले जात असले तरी काही शासकीय कर्मचारी अशा भागात व्यसनाधीन होऊन जातात. आणि बऱ्याचदा टाईमपास म्हणून आपल्या नोकरीकडे बघतात. व आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात.

**डोंगरी / दुर्गम क्षेत्रातील शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने** -

व्यक्तीच्या सभोवताली असलेल्या वातावरणाचा बरा वाईट परिणाम व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर होत असतो. दुर्गम डोंगराळ भागातील प्रतिकूल भौगोलिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीमुळे शालेय नेतृत्वाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. डोंगरी/दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी शिक्षण पूरक वातावरण आवश्यक असते. शिक्षण पूरक वातावरण तयार करण्यासाठी, विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाज यांच्यात यशस्वी आंतरक्रिया घडणे आवश्यक असते. मात्र बऱ्याचदा भाषेमुळे, पालकांच्या अज्ञान व अनास्थेमुळे, समाजातील अनिष्ट रूढी परंपरांमुळे, भौतिक सोयी सुविधा अभावी, शालेय नेतृत्व व विद्यार्थी, पालक, समाज यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रिया योग्य प्रकारे घडून येत नाहीत. अशावेळी शालेय नेतृत्वाला अपेक्षित यश प्राप्त करणे एक मोठे आव्हान ठरते. डोंगरी / दुर्गम भागात शालेय नेतृत्वापुढे अशी कोणती आव्हाने जाणवतात ते पुढे पाहू.

**डोंगरी /दुर्गम क्षेत्रातील शालेय नेतृत्वासामोरील आव्हाने**




१. **विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने**-

- डोंगरी, भागातील आदिवासी विद्यार्थ्यांची बोलीभाषा बऱ्याचदा शालेय नेतृत्वाला अवगत नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांशी आंतरक्रियेत अडथळे येतात. शिक्षकांना अपेक्षित अध्ययन अनुभव देणे शक्य होत नाही. मूल समजून घेण्यासाठी मुलांची भाषा शिक्षकाला माहीत करून घेणे हे नेतृत्वाला एक आव्हान ठरते.
- विद्यार्थ्यांची अनियमित उपस्थिती - शाळेचे महत्व व गोडी वाटत नसल्यामुळे, पालकाचे अज्ञान, दुर्लक्ष अथवा उपजीविकेसाठी बऱ्याचदा विद्यार्थी शाळेत अनियमित राहतात. त्यामुळे त्यांना शाळेत नियमित टिकवून ठेवणे हे नेतृत्वापुढे एक आव्हान असते.
- विद्यार्थ्यांची घरे एकमेकांपासून तसेच शाळेपासून लांब अंतरावर असतात. मुलांना शाळेत जंगलातून पाऊल वाटेने यावे लागते. अशा स्थितीत त्यांना बोलावून आणणे, त्यांच्या घरी जावून त्यांच्या अनुपस्थितीची कारणे जाणून घेणे. अवघड बनते त्यातच जंगलातील साप, विंचू,जंगली श्वापदे यांची भीती, पावसाळ्यात ओढे नाले यातील पाण्याची भीती, यासारख्या कारणांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतची काळजी या बाबीमुळे विद्यार्थ्यांना पूर्णवेळ शालेय वातावरणात टिकवून अपेक्षित अध्ययन निष्पत्ती पर्यंत घेवून जाणे हे शालेय नेतृत्वाला विद्यार्थ्यांच्या संदर्भात जाणवणारे एक आव्हान असते.

- शैक्षणिक स्पर्धांचा अभाव- डोंगरी दुर्गम भागातील शाळांमध्ये आदिवासी बहुल समाजाचे विद्यार्थी शिकत असतात त्यांची संख्याही अधिक नसते. शहरी भागासारखे स्पर्धेसाठी पूरक वातावरण त्यांना या शाळांत उपलब्ध करून पुढे घेवून जाणे हे शालेय नेतृत्वासमोर एक आव्हान असते.

२. **शिक्षकांशी संबंधित आव्हाने**-

- डोंगरी / दुर्गम भागात काम करण्याची मानसिकता नसल्याने शालेय नेतृत्वाला आपल्या सहकारी शिक्षकांचे अपेक्षित सहकार्य मिळविणे एक अवघड काम असते. अशा स्थितीत त्यांची मानसिकता बदलून त्यांना सतत कार्यप्रवण ठेवण्यासाठी प्रेरणा देणे हे शालेय नेतृत्वापुढील एक आव्हान असते.
- भौतिक सुविधे अभावी शिक्षक डोंगरी, दुर्गम भागात निवास करून राहण्याचे टाळतात. बऱ्याचदा वाहतुकीची सुरक्षित व्यवस्था नसल्याने शिक्षक अशा भागात बदलीने जाण्यास नाखुश असतात. महिला शिक्षक यांना डोंगरी भागातून नियमित शाळेत उपस्थित राहणे सुरक्षित वाटत नाही. अशा स्थितीत शिक्षक व नेतृत्व यांच्यात वादविवाद होण्याची शक्यता अधिक असते. अशा वेळी एकमेकांना समजून घेणे व शाळेसाठी चा पूर्ण वेळ सत्कारणी लावून अपेक्षित यश प्राप्त करणे हे नेतृत्वापुढील एक आव्हान असते.
- प्रतिकूल सामाजिक परिस्थितीचा विपरीत परिणाम म्हणून बऱ्याचदा काही शिक्षक व्यसनाधीनतेकडे वळण्याची शक्यता असते. अशा स्थितीत व्यसनाधीन सहकारी शिक्षकांना सांभाळणे व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्यांचा उचित उपयोग करून घेणे हे शालेय नेतृत्वापुढील एक आव्हान ठरते.
- शाळेतील आवश्यक भौतिक सुविधा अभावी विद्यार्थी तसेच काही शिक्षकांना देखील शाळेबाबत गोडी वाटत नाही. उदा. शाळेला इमारत नसणे, खेळाचे मैदान नसणे, शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी सोय नसणे, वीज, पाणी या सारख्या आवश्यक सुविधा नसणे त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक अनुभव देणे शिक्षकांना शक्य होत नाही. त्याचा विपरीत परिणाम शिक्षकांच्या मानसिकतेवर व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होतो.

३. **पालकांशी संबंधित आव्हाने** -

- रोजगार व गरिबीची समस्या - स्थानिक पातळीवर पुरेसा रोजगार उपलब्ध नसल्यामुळे उपजीविकेसाठी बाहेरगावी पालकांचे होणारे स्थलांतर, गुरे चारणे, लहान भावंडाना सांभाळणे, उपजीविकेसाठी छोटी मोठी कामे करून घेणे यासाठी पालक विद्यार्थ्यांची मदत घेतात. त्यामुळे विद्यार्थी शाळेत अनुपस्थित राहतात. त्यासाठी पालकांचे प्रबोधन करून त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे हे शालेय नेतृत्वापुढील एक आव्हान असते.
- डोंगरी भागातील बहुसंख्य पालक स्वतः शिक्षित नसल्यामुळे घरी मुलांचा अभ्यास घेवू शकत नाहीत. त्यामुळे घरच्या अभ्यासासाठी पालकांवर अवलंबून राहता येत नाही.
- अनुवांशिक आजार, कुपोषण, आरोग्य व स्वच्छता विषयक समस्या – स्वच्छतेबाबत पालकांमध्ये पुरेशी जागरुकता आढळून येत नाही. दारिद्र्यामुळे आवश्यक पुरेशे अन्न मिळत नसल्यामुळे तसेच अज्ञान व अंधश्रद्धा, यासारख्या समस्या मुळे पालक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे व आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्याचा एकंदर शालेय व्यवस्थापनांवर अर्थात शालेय नेतृत्वावर होणारा विपरीत परिणाम टाळणे हे एक आव्हान असते.

४. **समाजाशी संबंधित आव्हाने** -

- दुर्गम डोंगरी भागातील समाजाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शाळेच्या भौतिक सोयी सुविधेसाठी लोकसहभाग मिळविणे शालेय नेतृत्वापुढे एक आव्हान असते.
- समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, ( उदा. बालविवाह, मंत्र-तंत्रावरील अंधविश्वास ) व्यसनाधीनता, आपसातील भांडणे व वाद इत्यादींचा विपरीत परिणाम गाव विकासावर होतो. शालेय नेतृत्वापुढे गावातील अशा लोकांची शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मदत मिळविणे हे एक आव्हान असते.
- आपल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची जबाबदारी स्वीकारून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची हमी देणे. त्यासाठी सेवाभावी वृत्तीने सतत स्वयंप्रेरित राहून काम करणे. हे जसे शिक्षकांच्या मानसिकतेवर अवलंबून असते. तसे बऱ्याचदा समाजाच्या अपेक्षित पाठींब्यावरही अवलंबून असते. गावाचा आधार वाटत असेल तर शिक्षकांच्या हातून अभिमानास्पद कामगिरी होवू शकते. मात्र डोंगरी दुर्गम भागातील गरीब, अडाणी वा व्यसनाधीन समाजाचा विश्वास संपादन करून त्याला शिक्षणपूरक विधायकतेकडे घेवून जाणे एक आव्हान असते.

**डोंगरी / दुर्गम क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास** -

डोंगरी- दुर्गम भागातील शालेय नेतृत्वाला अशा अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. काही शिक्षक/ मुख्याध्यापक अशी आव्हाने समर्थपणे पेलतात. आपल्या नेतृत्व गुणांच्या माध्यमातून येणाऱ्या प्रत्येक समस्येवर योग्य मार्ग काढतात व आपली शाळा प्रगतीपथावर घेवून जाण्यात यशस्वी ठरतात. दुर्गम डोंगरी भागात काम करणाऱ्या महाराष्ट्रातील अशा काही यशस्वी शालेय नेतृत्वांच्या यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत. त्यांनी अनुसरलेल्या यशस्वी मार्गाने आपणही पदार्पण करणार आहोत. किंबहुना आपले नेतृत्व स्वतः विकसित करून आपल्याही शाळा प्रगतीपथावर घेवून जाण्यासाठी सज्ज होणार आहोत.

**मुख्याध्यापक यशोगाथा :** श्री रुपेशकुमार नागलगावे**,** डोंगरी क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्व



**मुख्याध्यापकाचे नाव** :- श्री रुपेशकुमार दिगंबर नागलगावे

**शाळा** :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काल्लेखेतपाडा (उमराणी बु.) ता धडगाव जि.नंदुरबार

मुळचे सोलापूर जिल्ह्यातील श्री रुपेशकुमार नागलगावे घरापासून ७०० ते ८०० किलोमीटर अंतरावरील नंदुरबार जिल्ह्यातील डोंगरी, दुर्गम भागातील काल्लेखेतपाडा या जिल्हा परिषदेच्या शाळेत जून २००९ मध्ये अतिशय आनंदाने रुजू व्हायला आले. मात्र तेथील भाषेची अडचण, पालकांच्या व्यसनाधीनतेमुळे होणारा त्रास, शाळेत जाण्यास रस्ता नाही गावापासुंचे खूप मोठे अंतर या अतिशय प्रतिकूल परिस्थितीने उद्विग्न होवून आपल्याला येथे काम करणे शक्य नाही असे समजून राजीनामा देवून निघून जातात. काही तांत्रिक कारणामुळे राजीनामा नामंजूर होतो त्यामुळे पुन्हा मनाची तयारी करून काहीतरी नवीन करून दाखविण्याची खुणगाठ बांधून

कामाला सुरुवात करतात. हळूहळू आपले नेतृत्व कौशल्य वापरून जिद्दीने प्रयत्नपूर्वक आपल्याला हवे तसे बदल घडवून आणतात शाळेचा सर्वांगीण विकास करीत तेथील आदिवासी बांधवांच्या गळयातला ताईत बनतात व १० वर्षाच्या कालावधीत जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त करतात.

आवश्यक बदल घडवायचा असेल तर तेथील मुलांशी/समाजाशी भावनिक जवळीकता साधणे आवश्यक असते त्यासाठी नागलगावे सरांनी स्थानिक सहकारी शिक्षक श्री तेगा पावरा यांच्या मदतीने मुलांची भाषा शिकण्यास सुरुवात केली. पालकांशी/ समाजाशी जवळीक साधण्यासाठी गावातील सण-उत्सव, सुख-दु:ख यात सहभागी होवून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. श्री लक्ष्मीपुत्र उप्पीन  व श्री तेगा पावरा या आपल्या सहकारी शिक्षकांना सोबत घेत प्रत्येक मुलाचे आरोग्य व स्वच्छता राखण्यासाठी मुलांची आंघोळ घालणे, केस कापणे, नखे काढून देणे, कपडे शिवणे इत्यादी पालकत्वाच्या भूमिकेतून केलेल्या कामांमुळे पालकांमध्ये शाळेबद्दल व शिक्षकांबद्दल ओढा व आपलेपणा वाढत गेला. लोकांना शिक्षक आपले वाटायला लागले. त्यांचे म्हणणे त्यांना पटायला लागले. सुरुवातीला दारूसाठी पैसे मागणारे/ त्रास देणारेही आता शाळेसाठी काही मदत देण्यास पुढे येवू लागले.






पालक व विद्यार्थ्यांशी भावनिक जवळीकता निर्माण होण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शिकण्याकडे, प्रगतीकडे लक्ष देणे आवश्यक होते. त्यासाठी श्री नागलगावे सरांनी, एक ही मुलगा शिक्षणापासून वंचित राहणार नाही हे उद्दिष्ट समोर ठेवून “भविष्य उद्याचे इथेच किलबिलते” या थीमद्वारे काम चालू केले.

१. इ १ ली चे प्रवेश १ मार्च पासूनच सुरु केले त्यामुळे मुलांची शाळापूर्व तयारी होवू लागली.
२. मुलांची दैनिक उपस्थिती वाढावी त्यासाठी दर महिन्याला ग्रामशिक्षण समिती व पालकांची सभा घेवून मुलांच्या शिक्षणाबाबत व शाळेच्या गरजांबाबत चर्चा केली जाते.
३. गावातील शिकलेल्या / शिक्षणाचे महत्व पटलेल्या पालक व तरुणांना सोबत घेवून प्रत्येक घरापर्यंत पोहचले.व माता पालकांचे उद्बोधन करण्यात आले.
४. ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य यांच्या वारंवार भेटी घेवून भौतिक सुविधा मिळविण्यासाठी प्रयत्न केले, लोक सहभागातून विद्यार्थ्यांसाठी स्वेटर, संगणक कक्ष, उपलब्ध करून घेण्यात आले.
५. विविध सामाजिक संस्थांकडून  शाळेच्या भौतिक सुविधांसाठी भरीव मदत मिळविली. त्यासाठी whatsapp , facebook यासारख्या सामाजिक माध्यमांचा यशस्वी उपयोग करून घेतला. अगदी परदेशातूनही यासाठी मदत मिळवता आली त्यातून शाळेला शैक्षणिक साहित्य, tablet इत्यादी बाबी उपलब्ध करून घेता आल्या.

६. शाळांतील मुलांच्या अभ्यासासाठी गावात अभ्यासकेंद्र निर्माण केले. घरच्या अभ्यासासाठी व स्थलांतरित पालकांच्या मुलांसाठी तर या अभ्यास केंद्राची खूप मदत होत आहे.

७. प्रत्येक घरी विद्यार्थीनिर्मित अभ्यासकोपरा करण्यात आला.




८. विद्यार्थी आता प्रत्यक्ष अनुभवातून ही काही बाबी शिकत आहेत. यात ग्राम सभेला भेट, ग्रामपंचायतीला/ पंचायत समितीला भेट, अगदी येथून ६० किलोमीटर अंतरावरील शहादा येथे खाजगी वाहनाने एकत्रित जावून तानाजी हा ऐतिहासिक चित्रपट पाहण्याचा अनुभव, बाल संसद कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेचा अनुभव इत्यादी बाबी नव्याने शिकत आहेत.




अशा प्रकारे अनेक सकारात्मक बदल घडवून आणण्यात श्री नागलगावे सरांना यश मिळाले आहे. आज शाळेला स्वतःची पक्की इमारत आहे, १० वर्षापूर्वी एक ते चार वर्ग असलेली १५ पट संख्येची द्विशिक्षकी शाळा आज एक ते सात पर्यंत एकूण ४ शिक्षकांसह १४० पटसंख्येची शाळा झाली आहे. यात शाळेच्या पाड्यावरील केवळ ३६ विद्यार्थी आहेत. बाकीचे इतर ठिकाणाहून शाळेत येतात. स्थलांतर तर नाहीच उलट काही मुले गावातील मामा,आत्या,काका यांच्या घरी पाहुणे म्हणून राहतात. शिक्षक संख्येच्या प्रमाणात शाळा खोल्या आहेच पण गावकऱ्यांच्या मदतीने शाळेसाठी सुंदर मैदान ही उपलब्ध झाले आहे. शाळेत digital माध्यमातून तसेच ज्ञान रचनावादी प्रक्रियेद्वारे अध्ययन अध्यापन चालते. शाळेबद्दल विद्यार्थी, पालक, शिक्षक, लोकप्रतिनिधी व पर्यवेक्षकीय अधिकारी समाधानी आहेत.

या यशाबाबत श्री नागलगावे त्यांचे सर्व सहकारी, वेळोवेळी प्रेरणा देणारे डायटचे तसेच शिक्षण विभागाचे पर्यवेक्षकीय अधिकारी, गावातील सरपंच, ग्राम शिक्षण समिती सदस्य, पालक व तरुण मुले यांचा ते आवर्जून उल्लेख करतात.

**चिंतनात्मक प्रश्न-**

१. श्री रुपेशकुमार नागलगावे यांच्या यशाबद्दल आपण कोणता अभिप्राय दयाल ?
२. श्री नागलगावे सर नोकरीचा राजीनामा कशामुळे देतात ?
३. कोणत्या गोष्टींमुळे सरांना विद्यार्थी व पालकांशी भावनिक जवळीकता साधता आली ?
४. प्रस्तुत गोष्टीतून श्री नागलगावे सरांचे कोणते गुणविशेष आपल्याला दिसतात ?
५. नागलगावे सरांनी काल्लेखेतपाडा येथे घडवून आणलेल्या यशस्वी बदलांची यादी करा.
६. अशाच डोंगरी दुर्गम क्षेत्रातील शाळेत तुम्हास मुख्याध्यापक/ शिक्षक म्हणून दिल्यास तुम्ही काय कराल?

**विचार करूया, चर्चा करूया.....**

१. आपण एका सपाटीच्या नागरी भागातील प्रगत शाळेतून एका आदिवासी बोली भाषा असलेल्या डोंगरी क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळेत बदलीने रुजू व्हायला आले आहात. शाळा वस्ती शाळेतून नुकतीच नियमित शाळा म्हणून रुपांतरीत झालेली आहे. शाळेची पटसंख्या २५ आहे. शाळेपर्यंत जाण्यासाठी ४ किलोमीटर ची जंगलातील एकच पायवाट आहे. दुसरे शिक्षक स्थानिक असून ३ वर्षापासून त्या शाळेत वस्तीशाळा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आपणास मुलांची भाषा कळत नाही. सदर शाळा प्रगत करण्याची जबाबदारी आपणावर आहे. आपण काय कराल ?

२. आपणास डोंगरी भागातील एका जिल्हा परिषद मराठी शाळेत शिक्षण सेवक म्हणून नोकरी मिळाली. आपण शाळेत रुजू होण्यासाठी आलात. पण २ दिवस आपणास शाळाच सापडली नाही. तिसऱ्या दिवशी दोन तीन ठिकाणी पाण्याने वाहत असलेला ओढा ओलांडून ७ किलोमीटर पायी चालत गेल्यावर आपण शाळेत पोहचला. शाळा एका खाजगी, कुडाच्या घरात भरते असे आपणास कळले. शाळेत एकही मूल हजर नाही. शाळेची पटसंख्या मात्र ४६ असल्याचे आपणास हजेरी पुस्तकावरून दिसून आले. आपण गावात काही मुलांशी संवाद साधू पाहत आहात. तेवढ्यात एका दारुड्याने आपणाकडे दारूसाठी पैशांची मागणी केली. आपण त्या दिवशी कशीबशी त्याच्या पासून आपली सुटका करून घेतली. घरी परत निघतांना आपणास अंधार झाला. भीत भीतच आपण घरी परतला. मात्र दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या शाळेत जायची हिम्मतच होत नाहीय. काय करणार ?

**डोंगरी दुर्गम क्षेत्रात शालेय नेतृत्वाला असही करता येईल.....**

**१.** मुलांची भाषा शिकण्यासाठी नेहमी वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा स्वतःचा एक शब्दकोश विकसित करून मोठ्या मुलांच्या मदतीने त्यांची बोली भाषा शिकता येईल. त्यासाठी काही तयार बोलीभाषाकोष ही वापरता येतील. उदा. डायट नंदुरबारचा सातपुड्याचा शब्दसागर
**२.** मुलांच्या भाषेतील संवाद मोबाईल मध्ये रेकार्ड करून digital साधनांद्वारे प्रदर्शित करता येतील.
**३.** ग्रामशिक्षण समितीच्या मदतीने शाळाविकास आराखडा तयार करून शाळेसाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून घेता येतील. शक्य असल्यास त्यासाठी पेसा अंतर्गत ग्रामपंचायत कडून काही निधी

मिळवता येईल. शाळेच्या चांगल्या उपक्रमांचे सामाजिक माध्यमांद्वारे प्रदर्शन करून शाळेसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध होण्यासाठी लोकसहभाग / CSR मिळविता येईल.

४. शाळेस रंगरंगोटी करून सजविणे, विविध खेळ, digital साहित्य, नाट्यीकरण, क्षेत्रभेटी इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लावता येईल. त्यातून त्यांना समृध्द व प्रत्यक्ष अनुभूती देता येईल.

५. लांबून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे गट करून शाळेत नियमित आणण्यासाठी गटनायक नेमणे अथवा काही पालक यांच्यावर पाळी लावून जबाबदारी सोपविता येईल.

६. गावातील पाड्यापाड्यावर पालकांच्या मदतीने मुलांना अभ्यासासाठी रात्रीचे ( संध्या.६ ते ९ पर्यंत चालणारे ) अभ्यासकेंद्र तयार करता येतील. किंवा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरात एक अभ्यास कोपरा तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना सांगता येईल.

**७.** स्थानिक समाजातील शिक्षित व्यक्तींच्या मदतीने / परिसरातील स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने/ digital साधनाच्या मदतीने गावात ठिकठिकाणी सभा घेवून शिक्षण व आरोग्यविषयक, समाजातील अनिष्ट रूढी परंपरा याबाबत उचित जागृती व समाजप्रबोधन करता येईल.

**८.** होळी सारख्या स्थानिक महत्वाच्या सणादरम्यान गाव व शाळा मिळून एकत्रित शिक्षणोत्सव / ग्रामोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

**९.** शाळेच्या परिसरात सहकारी शिक्षक व ग्रामस्थांच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी बाल वाचनालय, मनोरंजन,आरोग्य व क्रीडा केंद्र, बालसंसद, बालसभा, अभ्यास केंद्र, इत्यादी नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करता येईल.

**१०.** विविध गुणदर्शन, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला, प्रश्नमंजुषा, क्रीडा स्पर्धा इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करता येईल.

**शाळा विकास आराखडा –**

आपण सध्या कार्यरत असलेल्या शाळेची भौतिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती आपणास माहीत आहे. आपल्या शाळेची सद्यस्थिती लक्षात घेवून आपल्या शाळेचा एक वर्षासाठीचा शाळा विकास आराखडा तयार करा.

**डोंगरी / दुर्गम (आदिवासी) भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विशेष योजना –**

१. शासकीय आश्रम शाळासमूह योजना
२. स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य
३. आदर्श आश्रमशाळा
४. एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी आश्रमशाळा
५. आदिवासी मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृहे
६. आदिवासी विद्यार्थ्यांना शाळांत परीक्षेत्तोर शिष्यवृत्ती योजना
७. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क,परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती –योजना
८. व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे.
९. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना

१०. इयत्ता आठवी ते बारावी वर्गात शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना

११. १०/१२ वी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या गुणवत्ता यादीतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस योजना

१२. दर्जेदार शासकीय/अनुदानित आश्रमशाळांना विशेष प्रोत्साहनपर बक्षीस योजना

१३. आदिवासी मुलींमधील गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता

१४. आदिवासी विद्यार्थ्यांचा आकस्मिक मृत्यू झाल्यानंतर सानुग्रह अनुदान योजना

१५. आदिवासी शेतकर्यांना वीजपंप /तेलपंप पुरवठा

१६. केंद्रवर्ती अर्थसंकल्प

१७. व्यवसाय प्रशिक्षण (केंद्र पुरस्कृत) योजना

१८. स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना

१९. भारतीय संविधानाच्या २७५(१) अंतर्गत जिल्ह्यात वादी कार्यक्रम राबविणे – केंद्रीय सहाय्य

२०. आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना – केंद्रीय सहाय्य

२१. मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना

२२. सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण योजना

२३. खावटी कर्ज योजना

२४. धान्य कोष योजना

२५. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी

२६. आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना संस्थांना आदिवासी सेवक /सेवा संस्था पुरस्कार योजना

२७. आदिवासी हस्तकला प्रदर्शन

२८. आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा

२९. वारली चित्रकला स्पर्धा योजना

३०. आदिवासी युवकांसाठी नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण योजना

३१. नवसंजीवन योजना

३२. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी योजना

३३. तुषार ठिबक सिंचन योजना

३४. आदिवासी शेतकऱ्यांना दारिद्य रेषेवर आणण्यासाठी पकेज योजना

३५. शेळ्या मेंढ्यांचा गट पुरवठा करणे

३६. अवरुद्ध पाण्यात मत्स संवर्धन करणे.

३७. वैयक्तिक लाभाच्या योजना – व्याज अनुदान

इत्यादी योजना डोंगरी / आदिवासी क्षेत्रासाठी शासनामार्फत राबविल्या जातात. त्यासंदर्भातील अधिकाची माहिती संबंधित शासकीय कार्यालयात मिळू शकेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने डोंगरी क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भाने केलेला विचार-**

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये डोंगरी दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थ्यांसोबत सर्वच परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. यासाठी ऐतिहासिक दृष्टीने उपेक्षित, वंचित आणि अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक उत्तम माध्यम आहे. ज्याद्वारे समाजात समानता,समावेशकता आणि सामाजिक-आर्थिक गतिशीलता मिळू शकेल. अशा गटांमधील सर्व मुलांसाठी पूर्वापार अडथळे असले तरी या गटातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन यथोचित प्रगती करतील या दृष्टीने निश्चित पाऊले उचलली गेली पाहिजे असे म्हटले आहे.

२. वंचित क्षेत्रात शिक्षकांची पदे तात्काळ भरली जातील यासाठी स्थानिक शिक्षक किंवा स्थानिक भाषेशी परिचित शिक्षकांची नेमणूक करण्याकडे लक्ष दिले जाईल.तसेच ज्या क्षेत्रामध्ये मोठ्या संख्येने सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थी आहेत तेथील शाळेतील विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर २५:०१ पेक्षा कमी असेल.

३. गळतीचे प्रमाण कमी करणे व सर्व स्तरावर शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.

४. वेगवेगळ्या ऐतिहासिक आणि भौगोलिक कारणांमुळे आदिवासी जाती आणि समुदायातील मुले सुद्धा अनेक स्तरावर प्रतिकूल परिस्थितीशी सामना करतात.आदिवासी समुदायातील मुलांना ते घेत असलेले शालेय शिक्षण भिन्न, सांस्कृतिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अप्रासंगिक आणि अपरिचित वाटते. वास्तविक पाहता, आदिवासी समूहातील मुलांच्या प्रगतीसाठी अनेक कार्यक्रम सुरु आहेत, आणि ते पुढेही चालू राहतील. या चालू कार्यक्रमांचा आदिवासी मुलांना लाभ मिळावा यासाठी विशेष यंत्रणा तयार करण्याची गरज आहे.

५. काही भौगोलिक क्षेत्रांमध्ये प्रामुख्याने सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित गट (SEDGs) हा मोठ्या प्रमाणात आहे.असे आकडेवारी दर्शविते. आकांक्षित जिल्हे म्हणून ओळखलेल्या भौगोलिक ठिकाणी शैक्षणिक दृष्ट्या वंचित सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित (SEDGs) यांचे मोठ्या लोकसंख्येचे क्षेत्र हे विशेष शैक्षणिक क्षेत्र (SEZs) म्हणून घोषित केले जावे त्यांचे खरे शैक्षणिक परिदृश्य बदलण्यासाठी अतिरिक्त भरीव प्रयत्नांच्या माध्यमातून सर्व योजनांची व्यापकपणे अंमलबजावणी केली जाते.

६. सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित गट (SEDGs) अंतर्गत आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या शैक्षणिक विकासातील असमानता दूर करण्यासाठी विशेष लक्ष दिले जाईल या गटातील कुशाग्र विद्यार्थ्यांसाठी संबंधित क्षेत्रामध्ये वसतिगृहे,सेतू पाठ्यक्रमआणि शुल्क माफी करण्यासाठी तसेच शिष्यवृत्ती –आर्थिक सहाय्य प्रदान केल्या जाईल.त्यामुळे उच्च शिक्षणामध्ये या गटातील मुलांच्या प्रवेश सुलभ करता येतील.

७. समावेशकता आणि समता शिक्षक अध्यापनाचे प्रमुख अंग तयार होईल. (शाळेतील सर्व नेतृत्व प्रशासकीय आणि इतर पदांच्या प्रशिक्षणामध्ये सुद्धा) सोबतच सर्व विद्यार्थ्यांकरिता उत्कृष्ट आदर्श स्थिती उपलब्ध करण्याच्या दिशेने एक प्रयत्न केला जाईल. त्यासाठी सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित गटांमधील (SEDGs) उच्च गुणवत्तेचे शिक्षक व नेतृत्व करणाऱ्यांची निवड केल्या जाईल.

**डोंगरी क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका या मोड्यूलची  शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता** :

महाराष्ट्राचा सुमारे १/३ इतका भूभाग डोंगरी क्षेत्राने व्यापलेला आहे. इतका मोठा भाग दुर्गम डोंगरी उताराचा असून अशा दुर्गम प्रदेशात असंख्य आदिवासी बांधव वस्ती करून राहत आहे. डोंगरी क्षेत्रात राहणाऱ्या या वस्त्यांमध्ये भौगोलिक दृष्ट्या साम्य असले तरी भाषीक व सामाजिक दृष्ट्या फार मोठी विविधता आढळून येते. अशा दुर्गम भागात RTE २००९ नुसार तेथील बालकांना अपेक्षित शिक्षण हक्क प्राप्त करून देणेसाठी असंख्य समस्याना सामोरे जावे लागत आहे. मात्र शालेय स्तरावर विविध प्रशिक्षणे,कार्यशाळांच्या माध्यमातून शालेय नेतृत्वासाठी डोंगरी क्षेत्र हा मुख्य घटक लक्ष केंद्रित करून स्वतंत्रपणे मार्गदर्शन उपलब्ध नव्हते. या मोड्यूल च्या माध्यमातून डोंगरी क्षेत्रात अध्यापनाचे कार्य करणाऱ्या शालेय नेतृत्वाला अर्थात शिक्षक व मुख्याध्यापकांना उचित शैक्षणिक मार्गदर्शन नक्कीच मिळणार आहे. त्यामुळे

१. प्रत्येक विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यानुसार अपेक्षित गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने मदत मिळेल.
२. बालकाचा मोफत व सक्तीचा हक्क अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी शक्य होईल.
३. शालेय नेतृत्वाला प्रतिकूल डोंगरी क्षेत्रातील समस्या सोडविण्याचे प्रभावी मार्ग माहित होतील.
४. डोंगरी क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्वाचे कार्याने अशा प्रतिकूल क्षेत्रात कार्य करणाऱ्या असंख्य शिक्षक, मुख्याध्यापक यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल.
५. डोंगरी/ दुर्गम भागात नव्याने आलेल्या शिक्षकांमध्ये शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आदिवासी डोंगरी भागातील लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठीची संवेदनशीलता व त्या दूर करण्याचे कौशल्य वाढीस लागेल.

**समारोप :**

भौतिक परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य सक्षम  शालेय नेतृत्वाजवळ  असते. अपेक्षित यश मिळविण्यासाठी असा शालेय नेता प्रतिकूल परिस्थितीने खचून न जाता आपल्या सहकार्यांना सोबत घेतो, त्यांना विश्वासात घेवून, सतत प्रेरणा - प्रोत्साहन देत कार्यप्रवण ठेवतो.  पालक व समाजाच्या व्यथा वेदना जाणीवपूर्वक समजून घेवून समाजात शाळा व शिक्षकांप्रती विश्वास व जिव्हाळ्याचे संबंध दृढ करतो. आपल्या विद्यार्थ्यांना परके न मानता आपलेपणाने समजून घेतो. व्यक्त होण्यासाठी व त्यांच्या व्यक्तिमत्वाला योग्य आकार देण्यासाठी नाविन्यपूर्ण, विविधांगी अध्ययन अनुभव मिळावेत यासाठी आग्रही असतो. त्यांना प्रगतीच्या दिशेने घेवून जाण्यासाठी सतत धडपडत असतो. आणि जिद्दीने सतत स्वतः कृतीशील राहून शाळेच्या प्रगतीचे आपले  ध्येय साध्य करण्यात यशस्वी होतो. डोंगरी/दुर्गम क्षेत्रात यशस्वी कार्य करणारे श्री नागलगावे सरांसारखे अनेक मुख्याध्यापक/ शिक्षक आपल्या राज्यात कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून आपणही  एक यशस्वी शालेय नेतृत्व म्हणून उदयास यावेत हीच नम्र अपेक्षा......

**संदर्भ सूची –**


1. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८ संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे
2. निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
4. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डोविका -२००९ /प्र.क्र.६ /का.१४८३ मंत्रालय मुंबई दि १८ जानेवारी २०१०
5. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डोविका -२००९ /प्र.क्र.६ /का.१४८३ मंत्रालय मुंबई दि ३१ जुलै २०१२
6. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक डोविका -२०१५ /प्र.क्र.४२/का.१४८१-अ मंत्रालय मुंबई दि १५ जून २०१८
7. http://mahatribal.gov.in/ALL%20SCHEMES.pdf
8. http://mr.vikaspedia.in/learning-resources
9. http://samata.shiksha/mr/
10. https://www.ssampsp.org
11. https://youtu.be/zGeRFZNpyzM
12. https://youtu.be/Lo_fTFdXhOA
13. https://youtu.be/av1n23rcrWk



नाव : श्री अनिल सुपडू झोपे
पद : वरिष्ठ अधिव्याख्याता
कार्यालय : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार
राज्य : महाराष्ट्र